www.irjhis.com ©2021 IRJHIS | Volume 2 Issue 8 August 2021 | ISSN 2582-8568 | Impact Factor 5.71

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES

( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )

DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# मध्ययुगीन कालखंड आणि हिंदू समाजातील स्त्रियांचा दर्जा

## (The Medieval Period and the Status of Women in Hindu Society)

प्रा.डॉ. बी. डी. जाधवर

इतिहास विभाग प्रमुख

बलभीम महाविद्यालय, बीड

E-mail: bapujadhavar16@gmail.com

DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/08.2021-24656398/IRJHIS2108017

**प्रस्तावना :**

इतिहासाचा व्यापक अर्थाने विचार केला तर असे स्पष्ट होते की, इतिहासाला मर्यादा नाहीत. कारण एखादा प्रदेश, प्राणी, व्यक्ती, एकंदर पृथ्वीतलावर अस्तीत्वात असलेले आणि नसलेले सजीव आणि निर्जीव घटक यांचा विचार केला तर प्रत्येकाला इतिहास आहे. त्यामुळे इतिहासावर मर्यादा लादने हे कोणालाही शक्य नाही. इतिहासाचा अर्थच फार व्यापक आहे. कारण सर्व घटकांना इतिहास आहे. त्यामुळे असे म्हटले जाते की, एखाद्या प्रदेशाला इतिहास नसेल तर त्या प्रदेशाला भुगोल सुध्दा नाही. म्हणजे इतिहासाचे क्षेत्र फार मोठे आहे, असे नमूद करावे लागते. विस्तारीत क्षेत्राचा अभ्यास करणे सोईचे झाले पाहिजे, या बाबींचा विचार करून इतिहसकांनी इतिहासाचे तीन कालखंडात विभाजन केलेले आहे. त्या कालखंडापैकी इ.स.पू. ते इ.स. ७४६ हा पहिला कालखंड याला इतिहासामध्ये प्राचीन कालखंड म्हटले जाते. इ.स. ४७६ ते इ.स. १४५३ हा दुसरा कालखंड हा कालखंड मध्ययुगीन कालखंड म्हणून ओळखला जातो आणि वरील दोन्ही कालखंडानंतर तिसरा कालखंड म्हणजे आधुनिक कालखंड (इ.स. १४५३ ते आजतागायत) अशी वरील प्रमाणे इतिहासाची अभ्यासाच्या सोईसोईसाठी तिन कालखंडात विभागणी केलेली आहे आणि त्याविभागणी नुसार इतिहासकरांनी प्राचीन भारताचा इतिहास हे स्वतंत्रपणे अभ्यासासाठी ठेवले आहेत. यामध्ये प्राचीन कालखंडाचा विचार करता असे स्पष्ट होते की, प्राचीन कालखंडात ज्या घटना आणि घडामोडी घडल्या. त्या सर्व गोष्टींची नोंद प्राचीन कालखंडावर इतिहास लिहीणाऱ्या लेखकांनी घेणे आवश्यक आहे. मग तत्कालीन स्त्रिया सामाजिक, आर्थिक, धार्मीक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीचे विवेचन इ.स. ४७६ पर्यंतच्या काळात येते. त्याप्रमाणेच मध्ययुगीन काळाचा पण विचार केला जातो आणि त्यानंतर तिच परिस्थिती आधुनिक कालखंडाची सुध्दा आहे. मग राजकारण, समाजकारण, अर्थकारण याशिवाय स्त्रियांचे समाजातील स्थान प्रतिष्ठा या गोष्टी आधुनिक काळात पण नोट होतात. वरील सर्व गोष्टींचा वृत्तांत आपण या शोध निबंधात घेणार नाहीत. फक्त मध्ययुगीन कालखंड किंवा मोगल कालखंडातील हिंदू

समाजातील स्त्रियांचा दर्जा किंवा त्यांचे महत्व काय होते, होते की नव्हते यांविषयी माहिती प्रस्तुत शोध निबंधात मी रेखाटत आहे, ती खालील प्रमाणे.

मध्ययुगीन किंवा मोगल कालखंडातील हिंदू समाजातील स्त्रियांचा दर्जा विचारात घेत असता असे दिसते की, त्या काळात हिंदू समाजामध्ये एक पत्नीत्वाची प्रथा रूढ होती. परंतू राजे, महाराजे, सरदार सरंजामदार म्हणजे श्रीमंत वर्गामध्ये बहुपत्नीत्वाची पध्दती रूढ होते. वरील वर्गाच्या अनुकरणाचा भाग किंवा पुत्रप्राप्ती या कारणाने मध्यम व कनिष्ठ वर्गातपण हि पध्दती अस्तीत्वात आली होती. दक्षीणेत मंदिरांची संख्या जास्त होती. त्या मंदिरामध्ये देवदासी असत त्यांच्याशी समाजातील श्रीमंत लोक शारीरिक संबंध ठेवत. तसेच तमाशा कलावंतीणीशीही त्यांचे शारिरीक संबंध येत असत. यामधून समाजात मोठ्या प्रमाणावर अनौरस संततीची वाढ होत होती. याशिवाय विजयनगर राज्यामध्ये प्रामुख्याने स्त्रियांचे दोन विभाग किंवा वर्ग होते. त्यापैकी गस्ती स्त्रिया आणि भटक्या स्त्रिया हे होय. अंतःपूरात बंदिस्त असलेल्या स्त्रिया या गस्ती असत. त्या अमिर उमरावांच्या असत. तर भटक्या वर्गात मोडणाऱ्या स्त्रियांना कामासाठी बाहेर पडावे लागत असे. त्यामुळे त्या पडदा पध्दतीचा अवलंब करीत नसत. अमीर उमराव व श्रीमंतांच्या स्त्रियांना गायन, नृत्य, वाद्यसंगीत याचे शिक्षण दिले जात असे. त्याचे उदाहरण म्हणून यादव सम्राट कृष्णदेवरायच्या अंतःपुरातील स्त्रियांना संगीततज्ञ लक्ष्मीनारायण हे संगीत व नृत्य शिकवीत असत.

एकंदर उच्च वर्गातील स्त्रिया सोडता हिंदू समाजातील स्त्रियांना शिक्षण दिले जात नव्हते. 'चूल आणि मूल' याच म्हणीच्या चौकटीत त्यांना जिवन व्यथीत करावे लागे. परंतू हिंदी स्त्रियांना सौंदर्य साधनांचा वापर करता येत असे. त्या विविध अलंकार परिधान करत असत. नथ, कर्णभूषणे, सोन्या-चांदीचे हार, गोफ, नेकलेस, लॉकेट, कमरपट्टे, बिंदी, नुपूर हे अलंकार परिधान करत असत. एकंदर हा कालखंड मुस्लीम काळ असल्यामुळे हिंदू स्त्रियांचा मुस्लीम स्त्रियांशी संपर्क आला. त्यामुळे पडदा पध्दतीचे अनुकरण हिंदू स्त्रियांनी केले व त्या पध्दतीस कालांतराने प्रतिष्ठा प्राप्त झाली. पण हि पध्दती तळागाळातील हिंदू मध्ये अजिबात अस्तीत्वात नव्हती. या शिवाय हिंदू समाजातील तत्कालीन विवाह रूढीचा विचार केला तर अतिशय अल्पवयीन वधू-वर असतांना विवाह होत असत. उदा. राजस्थानमध्ये मारवाडी व धोला समाजात विवाहसमयी वधूचे वय फक्त दिड वर्ष आणि वराचे वय फक्त तीन वर्षाचे असल्याचे आढळून आलेले होते. याशिवाय मुलींना आपल्या पतीची निवड करण्याचे अजिबात स्वातंत्र्य नव्हते. ते सर्व मुलीचे आई वडील ठरवत असत. लग्न झाल्यानंतर संबंधित वधू हि तिच्या सासू-सासऱ्यांच्या नियंत्रणात असे. त्यामुळे त्यांना अजीबात स्वातंत्र्य नसे. एकंदर तत्कालीन हिंदू समाजातील स्त्रिया अधिकार हिन होत्या. कोणत्याही प्रकारचे त्यांना अधिकार नव्हते हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते.

**हुंडा पध्दती :**

मध्ययुगीन कालखंडात मुलगी जन्माला येणे ही घटना अप्रीय होती. कारण मुलीच्या विवाहप्रसंगी वधू-पित्याला फार मोठा हुंडा लागत असे. मोठ्या प्रमाणावर वधूपित्याने वरपित्याचा हुंडा दिल्याशिवाय अनुरूप असा वर मिळत नसे. वरिल प्रथेमुळे अनेक कुटूंब उध्दवस्त झालेली होती. वधू पित्यासमोर अनंत समस्या निर्माण होत असत. मुलीच्या

विवाहानंतर तोच वधूपिता आपल्या मुलाच्या विवाह प्रसंगी होणाऱ्या वधू पित्याकडून मोठा हुंडा घेऊन वचपा काढीत असे. विवाह झाल्यानंतर मुलीला सासरी मिळेल ती वागणूक सहन करावी लागत असे. म्हणजे "चुलीतले लाकूड चुलीतच जळले पाहिजे" हा दंडक त्याकाळी होता. तरी पण सर्व सहन करून हिंदू स्त्रिया पतीशी एकनिष्ठ असत. वटपौर्णिमेला वडाच्या झाडाची मनोभावे पुजा करून वडाला अकरा प्रदिक्षणा घालुन हाच पती सात जन्म लाभो अशा प्रार्थना स्त्रिया करत असत.

**बहुपत्नीत्वाची पध्दती :**

तत्कालीन पध्दतीचा विचार केला तर असे दिसते की, बहुपत्नीत्व स्विकारणाऱ्या कुटूंबातील स्त्रियांपक्षा एकपत्नीत्व स्विकारलेल्या कुटूंबीतील स्त्रियांचे स्थान व दर्जा निश्चितच चांगला होता. हिंदू समाजात त्याकाळात गर्भश्रीमंत वर्गात बहुपत्नीत्वाची प्रथा सर्रास होती. ज्या राजे, महाराजे, सरदार यांच्यापैकी ज्यांच्या अंतःपूरात स्त्रियांची संख्या जास्त त्यांना प्रतिष्ठीत समजले जात असे. याशिवाय संतती प्राप्तीसाठी बहुपत्नीत्वाची प्रथा रूढ होती. अंतःपुरातील सर्व स्त्रियांना राणी पदाचा मान मिळत नसे. त्यामुळे शेकडोजणी 'खवासन' पदयितन, रखेल्या म्हणून असत. होयसाळचा राजा नरसिंहदेव यांच्या अंतःपूरात ३८४ राण्या होत्या. तसेच कृष्णदेवरायाच्या अधिकृत बारा राण्या होत्या. त्या कोणाच्याही नजरेत पडत नसत. प्रख्यात इतिहसाकार पेयीस व निकोलस कोंटी यांच्या मतानुसार कृष्णदेवरायाला बारा हजार बायका होत्या. त्या बारा हजारापैकी तीन हजार बायकांची निवड राजाच्या मृत्यूनंतर त्यांनी स्वखुशीने सती जावे या अटीवर केलेली होती. एकंदर स्त्रिजिवनाची ही भयानक स्थिती होती.

**मध्ययुगीन हिंदू स्त्रियांचे अधिकार व कर्तृत्व :**

हिंदू समाजातील स्त्रियांना मध्ययुगीन काळात सर्व हक्क नाकारण्यात आलेले होते. कोणताही करार मदार न करणे फक्त धार्मीक बाबतीत पुरुषाप्रमाणे स्त्रियांना अधिकार होते. घरामध्ये मात्र स्त्रियांच्या कलानेचे सर्व व्यवहार चालत असत. त्यामुळे त्या श्रेष्ठत्व होते. याशिवाय राजवाड्यातील इतर कामे म्हणजे धोब्यांचे, भोयांचे, हमालांचे, हिशोब ठेवणे, राज्यातील सर्व घडामोडींचा तपशिल रेखाटणे ही सर्व कामे स्त्रिया करत असत.

वरील सर्व गोष्टी शिवाय एखादा राजा जेंव्हा लष्करी मोहिमेवर निघत असत तेंव्हा राण्या पण त्यांच्यासोबत होत्या. उदा. इ.स. १५१५ मध्ये यादव सम्राट कृष्णदेवरायने कोंडविदूला वेढा घातला. तेंव्हा त्यांच्या सोबत दोन राण्या होत्या. त्या म्हणजे चिन्नादेवीअम्मा व तिरूमलादेवीअम्मा या होय. तसेच पहिला बुक्करायचा मुलगा कंपणाची पत्नी गंगादेवी या स्त्रिने 'मदुराविजयम' नावांचा ग्रंथ लिहीला. तसेच कृष्णदेवरायची मुलगी तिरूमलांबा ही रामरायची पत्नी होती (मोहनांगी) तिने 'मारिची परिणयम" हे प्रेमकाव्य रचले होते. केळदीची राणी 'चेन्नम्मा' हिने आपल्या दत्तक मुलाला राजकारणाचे धडे दिल्याच्या इतिहासात नोंदी आहेत. याशिवाय राजमाता जिजाबाई, राणी येसूबाई, हंबीरराव मोहिते यांची कन्या महाराणी ताराबाई इत्यादी स्त्रियाने वेळप्रसंगी अधिकार वापरून आपले कर्तृत्व दाखवले होते.

**विधवा स्त्रियांची स्थिती :**

समाजात स्त्रिला मानाचे स्थान मिळते ते केवळ एखाद्याची पत्नी म्हणूनच मिळते. त्यामुळे स्त्रीच्या वैवाहिक जिवनाचा मोठा आधार म्हणजे पती होय. पति निधनानंतर स्त्रिचे जिवन हे फार निराशा जनक होत [illegible] अपमानित गोष्टींना सामोरे जावे लागत असे. त्याविषयी असे स्पष्ट होते की, तत्कालीन परिस्थितीत विधवा विवाह होत नसत. त्यामुळे विधवा स्त्रिला आपल्या अलंकाराचा त्याग करावा लागे. तसेच केशवपन करणे व अतिशय कष्टदायी जिवन त्यांना जगावे लागत असे. पतिच्या संपत्तीत तिला वाटा मिळत नसे. धार्मीक कार्याप्रसंगी उपस्थित रहाता येत नसे. तिची उपस्थिती ही अशुभ मानली जात असे. नवऱ्याचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या चितेवरच पत्नीने स्वतःला जाळून घेऊन त्या पाठोपाठ तिने सती जावे अशी तिच्या कुटूंबाची व समाजाची भूमिका बनलेली होती.

**तत्कालीन हिंदू स्त्रिया व सतीपृथा :**

या प्रथेत भारतीय समाजाला मोठे गोलबोट लागले होते. पती निधनानंतर विधवा स्त्रिने सती गेलेच पाहिजे असा एक दंडक तयार झालेला होता. राजस्थान मध्ये हिंदू समाजातील अनेक स्त्रिया सती गेल्याची असंख्य उदाहरणं आहेत तत्कालीन युध्दजन्य परिस्थितीमुळे सतीची प्रथा रूढ झालेली होती. एखाद्या युध्दात शत्रू समोर जेंव्हा राजा पराभूत होता तेंव्हा विजेता शासक ते शेहर व गढी ताब्यात घेऊन तेथील स्त्रियांचा विनयभंग करीत असत. असे अपमानास्पद लाजीरवाणे जिवन जगण्यापेक्षा कित्येक स्त्रीया पती निधनानंतर आनंदाने सती जात असत. तत्कालीन स्त्रियांचे पती रणांगणावर लढतात. अशा वेळेतच स्त्रीयांनी स्वतःला जाळून घेतले तर त्याला 'जोहार' असे म्हटले जात असे. इ.स. १३०१ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने रणथंभोरच्या किल्ल्याला वेढा घातला. तेंव्हा रणथंभोर राणा हमीर याला स्वतःचा पराभव स्पष्ट दिसू लागला. तेंव्हा त्याने पेटवलेल्या होळीत त्याच्या सर्व राण्यानी उड्या टाकल्या व तो पण खिलजीशी लढत असताना मृत्यू पावला. यावरून असे स्पष्ट होते की, मध्ययुगीन कालखंडात हिंदू समाजातील कोणीही स्त्री असते. त्या स्त्रिने वैधव्याचे जिवन न जगता पतिच्या निधनानंतर सती गेलेच पाहिजे.

**वारांगणा, गणिका व देवदासी आणि हिंदू स्त्रिया :**

विजयनगर साम्राज्यातील वारांगणाचे मंदिरात किंवा देवळात राहणाऱ्या स्त्रीया या देवदासी आणि स्वतंत्रपणे जीवन जगणाऱ्या गणिका असे दोन प्रकार त्याकाळी अस्तित्वात होते. वारांगणना गायना वाचन, नृत्य, वाद्य, जिवनावश्यक कला या गोष्टी आत्मसात होत्या व शिकवल्या जात असत. वयामध्ये आलेल्या मुलीला 'कृष्णरिक समारंभ' करून या व्यवसायात पाठवत असत.

देवदासी या पूजेमध्ये नृत्य व गायन करत असत. महानवमीचा उत्सव विजयनगर मध्ये मोठ्या दिमाखात साजरा होत असे. त्यामध्ये देवदासी व गणीका यांना सहभाग घ्यावा लागत असे. आंध्रप्रदेशातील हे देवदासींना तेलगूत 'सानी' म्हणत सामान्य नागरीक सरदार, राजे यांच्याकडून इनाम मिळालेल्या जमिनी व नियमित वेतन यावर त्यांचा उदरनिर्वाह चालत होता.

वरील प्रमाणे मध्ययुगीन कालखंडातील हिंदू स्त्रिया व समाजातील त्यांचे अधिकार हक्क, दर्जा, स्थान काय होते. या बाबींचा वेगवेगळ्या मुद्यांचे आधारे या शोध निबंधात नमूद केलेले आहे.

**संदर्भ सूची :**


१. डॉ. आचार्य धनंजय, मध्ययुगीन भारताचा इतिहास श्री. साईनाथ प्रकाशन, पुणे जुलै २००८

२. मालसे स.गं., गतशतक शोधताना, प्रतिमा प्रकाश, पुणे १९८९.

३. पुंगलीया सुनीती, स्त्री आणि कायदा.

४. नंदिता गांधी व नंदिता शहा, स्त्री संघर्षाची नवी रुपे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

५. बाबर सरोजिनी, स्त्री जिवनाची वाटचाल, १९६८.

६. डॉ. परांजपे तारा, अबला झाल्या सबला, मराठवाडा दिवाळी अंक १९७१.